**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक १३-०५-२००८, दिनांक ११-११-२००८ व दिनांक ३०-१२-२००८ रोजी अनुक्रमे कोल्हापूर, पुणे व कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अनुक्रमे श्री. सुरेश शामराव पोवार रा. ५९५, ए वार्ड, खंडोबा तालीम शेजारी, शिवाजी पेठ, कोल्हापूर, श्रीमती बनाबाई धोंडीराम पाटील व श्री. रघुनाथ महिपती हळदकर रा. चंद्रे (मोरेबाडी), पो. का वाळवे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर व श्री. दत्तात्रय राजाराम पाटील वाडी रोड, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर या अपीलकर्त्यांच्या खालील अपिलांचा समावेश होता :

| अ.क्र. | अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | २७० / कोल्हापूर | उप शहर अभियंता, वि.क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | औद्योगिक क्षेत्रात मॉलसाठी परवानगी दिली असल्यास त्याबाबत माहिती | कागदपत्रे मिळाल्याचे अपीलकर्ता यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ४४२ / कोल्हापूर | कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर, जि.कोल्हापूर | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | बँक सेव्हिंग खाते क्र. ३५८ मधील रक्कम वसूल करून मिळणेबाबत | अपीलकर्त्यांनी विचारलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती म्हणून येत नाही. |
| ३ | ४९० / कोल्हापूर | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर | अधीक्षक भूमि अभिलेख, कोल्हापूर, जुने पोलीस मुख्यालय, बुधवार पेठ, कोल्हापूर | मोजणीच्या महसूलाबाबत व इतर | अपीलकर्ता यांनी माहिती मिळाल्याचे लेखी कळविले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले क्र. १ ते ३ (क्र. २७०, ४४२ व ४९०) निकाली काढण्यात येत आहेत

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१-०१-२००९

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ४७६/ सोलापूर | श्री. साथी बशीर बाशामियाँ शेख ४१२ तुळजा-भवानी नगर, अक्कलकोट रोड, सूत मिल मागे, सोलापूर | कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन (१),जिल्हा परिषद, सोलापूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर | दि. ४.९.०६ रोजी दिलेल्या निवेदनावर झालेल्या कारवाईची माहिती, कारवाई करणा-या सबंधित कर्मचा-यावर कार्यवाही करून त्याच्या नकला निरीक्षणासाठी मिळाव्या. | आवश्यक माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |
| ६ | ३५२/ सोलापूर | श्री.इब्राहिम इस्माईल तडकल ६५२, साखर पेठ सोलापूर | माहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, भांबुर्डा, पुणे | सह संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, भांबुर्डा, पुणे | हाशमियाँ बैरूलफैज उर्दू अध्यापक विद्यालय, सोलापूर व नूर एज्युकेशन सोसा. अध्यापक विद्यालय, मैंदर्गी या महाविद्यालयातील मागास व खुला संवर्ग क्षमतेबाबत, तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत १ ते १७ मुद्यांची माहिती. | आवश्यक माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील तक्त्यातील अ. क्र. १ ते ६ अपिले (क्र. ३४६, ४९४, ५४४, ४७२, ,४७६, व ३५२ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.२९.१.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ११-११-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३५६ / कोल्हापूर | श्री. विनायकराव गणपतराव काळे ६५८, डी वॉर्ड, शाहू उद्यान समोर, गंगावेस, कोल्हापूर-२ | सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापुर | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | टि.पी. स्कीम नं.४ नकाशे व बी फॉर्म | अपीलकर्त्यांनी मागविलेली माहिती कोल्हापूर महानगरपालिके-कडे उपलब्ध नसून ती शासनाकडून प्राप्त होताच अपीलकर्त्यांस देण्याचे सर्वानुमते ठरले. असे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | ३७४ / कोल्हापूर | श्री. रामचंद्र धोंडीराम दवणे रा. रामणवाडी, पो.फेजिवडे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.राधानगरी, जि. कोल्हापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, २०४/ख/ई, शाहूपुरी, भू-विकास बँक, इमारत, ३रा मजला, हॉटेल पर्लजवळ, कोल्हापूर | अपीलकर्त्यांच्या मयत वडिलांच्या नावे श्री फेजिवडे नवभारत विविध कार्य. सह. (विकास) सेवा संस्था मर्या. कडील असणाऱ्या शेअर्सच्या रक्कमेबाबत | शेअर्सची रक्कम मिळाल्याने अपील निकाली काढावे, असे अपीलकर्त्याने संस्थेला लेखी कळविले आहे. |
| ३ | ३८९ / कोल्हापूर | सभापती, वसंतदादा पाटील नागरी सहकारी पत संस्था मर्यादित, पिंपळगाव खुर्द, ता.कागल, जि.कोल्हापूर | मॅनेजर, नूतन नागरी सहकारी पत संस्था मर्या. कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, कागल, ता. कागल, जि.कोल्हापूर | नूतन नागरी सहकारी पत संस्था मर्या., कागल च्या सभापती, उपसभापती व संचालक मंडळ यांची यादी पत्यासह मिळणेबाबत | नूतन नागरी सहकारी पत संस्था मर्या. ने अपीलकर्त्यांस माहिती दिल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४०३ / कोल्हापूर | श्री. योव्हेल विजयकुमार गौरी बंदी क्र.सी/२५९१, सर्कल नं.६/४, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, कोल्हापूर | कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कोल्हापूर | अधिक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कोल्हापूर | अपीलकर्त्यास वेगवेगळ्या बॅरेक्स मध्ये ठेवल्याबाबत | माहितीबाबत पूर्ण समाधानी असल्याने अपील निकाली काढण्यास अपीलकर्त्याने लेखी कळविले आहे. |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्र. ३५६, ३७४, ३८९ व ४०३ / कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ३५६ / कोल्हापूर संदर्भात माहिती शासनाकडून उपलब्ध होताच अपीलकर्त्यास देण्याचे उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, त्यानुसार हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक महिन्यांत पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१-०१-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यापुढे**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री शिवाजी बाबुराव किर्तकर
रा. शिंदे आळी, तासगाव,
ता.तासगाव, जिल्हा सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उपआयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
पुणे १.

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी
मुख्याधिकारी,
तासगाव नगरपरिषद , जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/३/२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २/४/२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/६/२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०/०७/२०७ |
| ७ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | सि.स.न.३१०६मध्ये विनापरवाना श्री.दिलीप बाबुराव चव्हाण यांनी केलेल्या बांधकामाबाबत माहिती |

## निवेदन

श्री.दिलीप बाबुराव चव्हाण यांच्या सि.स.नं.३१०६ येथील बांधकामाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.शिवाजी बाबुराव किर्तकर यांनी मागितली होती. श्री. दिलीप चव्हाण यांनी सि.स.नं.३१०६ मध्ये अनधिकृत बांधकाम केले आहे अगर कसे याबाबत समक्ष पाहणी करुन त्याबाबत अर्जदारास योग्य ते उत्तर देण्याबाबतचे आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिले होते.

अपिलीय प्राधिकारीं तथा आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे यांच्या दि. १०/७/२००७ च्या निर्णयानुसार जागेची प्रत्यक्ष पाहणी केली असता याबाबत प्रॉपर्टी कार्डच्या नोंदीविषयी अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली येथे रिव्हिजन अर्ज दाखल करण्यात आल्याचे मुख्याधिकारी, तासगांव नगरपालिका ,तासगांव यांनी दि. १०/१०/२००८ रोजी आयोगास कळविले आहे. त्यांनी ही बाब अपीलकर्त्यास कळविली आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.१४-०१-२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दिनांक २२-१०-२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे - नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४२७/ सांगली | श्री.गणेश दामोदर कुळकर्णी भारत भूषण शाळेनजीक, ब्राम्हणपुरी, मिरज, जिल्हा सांगली | चिटणीस, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे १ | उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे १ | वतन जमिनीच्या २००० चे सुधारित कायद्यांची अंमलबजावणी बाबत २ मुद्दयांची माहिती. | अपीलकर्त्यास माहिती देण्यात आलेली आहे. मात्र अपीलकर्त्याची शासनाचे परिपत्रक क्रमांक वतन/१०९९/प्र.क्र. २२३/ल ४ दिनांक ९ जुलै २००२ रोजी वरील कायदयाची अंमलबजवणी करणेबाबतची, मागणी कारवाईची आहे. ही बाब माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | ५६१/ सांगली | श्री.भाऊसाहेब बाबुराव कांबळे मु.पो.विटा, (फुलेनगर) ता.खानापूर, जिल्हा सांगली | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय विटा, ता.विटा, जिल्हा सांगली | तहसीलदार, तहसील कार्यालय विटा, ता.विटा, जिल्हा सांगली | तहसीलदार, विटा यांनी दि.५/२/२००७ रोजी दिलेला निर्णय रद्द करणे | अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केलेले नाही. तसेच मागणी केलेली माहिती नसून कारवाईची बाब आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही |

## आदेश

(१) वरील तक्त्यात नमूद केलेले २ अपिले (क्र.४२७ व ५६१ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १९-०१-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलाचा खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४६२ / कोल्हापूर | श्री. राजाराम मारूती भूजवडकर मु.पो.कोष्टी-गल्ली, ता.कागल, जि.कोल्हापूर | कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्या., जि.कोल्हापूर | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर जि. कोल्हापूर | नोकरीवरून कमी केलेल्या आदेशाची व हजेरी पत्रकाची तसेच गोपनीय अहवालाची प्रत तीन वेगवेगळ्या अर्जानुसार अपीलकर्त्याने मागितली होती. | तीन घटकांमध्ये झालेल्या चर्चेनुसार मुद्दा क्र.एक व दोनची माहिती अपीलकर्त्यास देण्याबाबत एकमत झालेले आहे. मुद्दा क्रमांक तीनची माहिती मिळाली नाही तरी चालेल असे अपीलकर्त्याने मान्य केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलामध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि. ३०.१.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक ३०-१२-२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४७० / कोल्हापूर | श्री. राजेंद्र धोंडीराम दाभाडे मु.पो. ता. शिरोळ (यादवनगर), ता. शिरोळ, जि.कोल्हापूर | नायब तहसीलदार, शिरोळ, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर | तहसीलदार शिरोळ, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर | दिनांक ०१-०५-२००१ ते दिनांक ०१-०४-२००८ पर्यंत तलाठी शिरोळ यांनी भूमिहिनांना दिलेल्या दाखल्यांना कोणते निकष लावले व सदर दाखल्यांच्या रजिस्टरची झेरॉक्स प्रत | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. गाव कामगार तलाठी यांनी रजिस्टर ठेवले नसल्यास ठेवणेबाबत तलाठी यांना सूचना देण्यात येत असल्याचे, तसेच परिपूर्ण माहिती गावकामगार तलाठी यांच्याकडून घेऊन अपिलकर्त्यास आठ दिवसात नि:शुल्क देण्याचे ठरले. |
| २ | ४७६ / कोल्हापूर | श्री. शहाजी श्रीपती पाटील मु.पो.तिरपण, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | मुख्याध्यापिका, श्री. विलासराव कोरे हायस्कुल, म्हाळूंगे तर्फे बोरगाव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर | सन २००२ ते २००७ अखेर शिक्षकनिहाय वेळापत्रक, वार्षिक तपासणीसाठी शिक्षक यादीची झेरॉक्स, संचालक मंडळाच्या यादीची झेरॉक्स, संस्थेच्या लेटरपॅडवर अनुभवाचा दाखला, इत्यादी | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. अपिलकर्त्याने मागणी केल्याप्रमाणे माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०१-२००९ पर्यंत देण्याचे ठरले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४७८ / कोल्हापूर | श्री. सुर्यकांत भिमराव कांबळे मु.पो.आळते, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर | प्राचार्य, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरुड, ता. शिराळा, जि.कोल्हापूर | प्राचार्य, बाबा नाईक महाविद्यालय, कोकरुड, ता.शिराळा, जि.कोल्हापूर | माहे जून १९९९ ते माहे जुलै २००८ पर्यंतच्या सर्व अधिव्याख्यात्यांच्या (शिक्षक) मस्टरच्या झेरॉक्स प्रती | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. माहिती चार दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास देण्याचे ठरले. |
| ४ | ४९१ / कोल्हापूर | श्री. शंकर सोमाण्णा साळे वरिष्ठ लिपिक उप विभाग पोलीस अधिकारी, शहर विभाग कार्यालय, सोन्या मारुती चौक, बुधवार पेठ, कोल्हापूर | कार्यालय अधिक्षक, मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर, जि.कोल्हापूर | पोलीस उप अधिक्षक (वाचक), कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर | १. दिनांक १८-०६-१९८३ च्या परिपत्रकाची प्रत, २. दिनांक २४-१२-२००० च्या आदेशान्वये प्राप्त झालेली वरीष्ठश्रेणी पदाची पदोन्नती नाकारल्याबाबत अर्जाची छायांकित प्रत, ३. दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या विनंती अर्जावर झालेल्या निर्णयाची प्रत, ४. श्री. हळदणकर यांनी पदोन्नती नाकारली असल्याने त्यांचे वरीष्ठ लिपिक पदात कोणत्या लिपिकाची नेमणूक / पदोन्नती झाली त्या आदेशाची प्रत, ५. पोलीस अधिक्षक, सांगली यांना पदोन्नतीवर सोडण्यात आले नसताना त्यांचे निवडसूचीवरुन कोणत्या आधारे नाव कमी केले त्याबाबतचा नियम | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. मुळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ ची माहिती आठ दिवसात जन माहिती अधिकारी यांनी देण्याचे ठरले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ५०१ / कोल्हापूर | श्री. अशोकराव आनंदराव भंडारे सि.स.नं.१५२, ई-वॉर्ड, सदर बाजार, कोल्हापूर | नगर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर | उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | विधी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका ॲड.ए.आर.तोरा यांनी रेक नं.२८५/२००२ या दाव्याच्या निकालाबाबत नगर अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका यांना दिनांक२४-०६-२००३ रोजी दिलेल्या पत्राची नक्कल | अपील निकाली काढण्याबाबत एकमत. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीबाबतची संपूर्ण नस्ती अपिलकर्ता यांना सात दिवसात दाखवून त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याचे ठरले. |

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यातील चर्चेअंतीचा निष्कर्ष नोंदवून त्यानुसार कार्यवाहीचे आदेश देऊन ही अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले क्र. १ ते ५ (क्र. ४७०, ४७६, ४७८, ४९१ व ५०१) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याचे उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५-०१-२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. गोविंद रामा जासुद
मु.पो.पोखर्णी, ता.वाळवा,
जिल्हा सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद , सांगली — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी ,
जिल्हा परिषद सांगली (ग्रा.प.)
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७०३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. - |
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२/४/२००८ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४/६/२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७/६/२००८ |
| ७ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | १) सेवा निवृत्ती वेतनाची सद्यस्थिती<br>२) रजा रोखीकरण बील<br>३) भविष्य निर्वाह निधी बील<br>४) गट विमा बील अदा होणेबाबत. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गोविंद रामा जासूद यांनी त्यांच्या सेवा निवृत्तीविषयक आर्थिक लाभ मिळण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद , सांगली यांच्याकडे अर्ज केला होता. अडिच वर्षाचा कालावधी होऊनही हे लाभ मिळाले नसल्याचे श्री. जासुद यांनी नमूद

केले आहे. या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली. परंतु प्राप्त माहितीचे समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. परंतु उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र श्री.जासूद यांच्या मागणीबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांना देणे आवश्यक आहे.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता श्री. गोविंद रामा जासूद यांना जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात माहिती द्यावी, व तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा. पूर्तता न झाल्यास ते कारवाईस पात्र राहतील.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १४.०१.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय हनुमंत पिसे
मु.घोरपडवाडी, पो.गोतोंडी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७१ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
पुणे विभाग, साखर संकुल, शिवाजीनगर, जि.पुणे
प्रतिनिधी श्री.डी.टी.भापकर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर, जि.सोलापूर श्री.ए.डी.सातपुते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.१२.२००६(प्राप्त ८.१२.२००६) |

| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.३.२००७ |
|---|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अहिल्यादेवी खादी ग्रामोद्योग घोंगडी उत्पादन सहकारी संस्था मर्यादित, पंढरपूर या संस्थेच्या सभासदांची यादी, संस्थेचे घोंगडी उत्पादन ठिकाण, संस्थेचे ताळेबंदपत्रक इ. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संजय हणमंत पिसे यांनी सोलापूर जिल्हा अहिल्यादेवी खादी ग्रामोद्योग घोंगडी उत्पादन सहकारी संस्था मर्यादित, पंढरपूर या संस्थेबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. (संस्थेचे योग्य नाव 'सोलापूर जिल्हा अहिल्यादेवी खादी ग्रामोद्योग घोंगडी उत्पादक संस्थांचे फेडरेशन लि., पंढरपूर' असे असल्याचे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी त्यांना कळविले.) या संस्थेला शासकीय भांडवल अथवा कर्ज मिळालेले नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संस्थेला लागू नाही अशी भूमिका संस्थेने घेतली. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पंढरपूर यांनी संस्थेकडून माहिती मिळवून श्री.पिसे यांना पुरविली. तसेच संस्थेचे लेखापरीक्षण चालू असल्याने लेखापरीक्षणातील ताळेबंद व इतर माहिती सादर करण्याची दक्षता घेत असल्याचे संस्थेच्या अध्यक्षांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पंढरपूर यांना कळविले. त्याविरुध्द श्री.पिसे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग यांच्याकडे अपील केले. श्री.पिसे यांना आवश्यक असलेली माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना दिला. त्यानुसार योग्य ते शुल्क भरुन माहिती नेण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.पिसे यांना कळविले. परंतु आपल्याला माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.पिसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपल्याला माहिती अद्यापही मिळाली नसल्याचे श्री.पिसे यांनी दि.२४.६.२००८ रोजी आयोगाच्या पुणे खंडपीठाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या प्रपत्रात नमूद केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.पिसे यांना माहिती घेऊन जाण्याबाबत दि.२९.५.२००७, २७.१२.२००७ व दि.२४.६.२००८ रोजी कळविले होते. परंतु श्री.पिसे यांनी माहिती नेली नाही,

असे अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. दि.२७.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनातही त्यांनी श्री.पिसे माहिती घेऊन जात नसल्याचे कळविले होते. शुल्काबाबत अथवा माहिती नेण्याबाबत अपीलकर्त्याने लेखी अथवा तोंडी काहीही कळविलेले नाही. अपीलकर्त्याची ही कृती योग्य नाही.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१९.१.२००९**

जानेवारी-२००९

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. भगवान बापु माने
सुखदा प्लॉट नं. १६, गणेशनगर,
कुपवाड रोड, मिरज,
जिल्हा सांगली.

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
तहसीलदार,
तहसील कार्यालय, मिरज,
जिल्हा सांगली

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,मिरज,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१८ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. - |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८/८/२०८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९/९/२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | अपीलकर्त्याचा मुलगा श्री. अभिजीत यांचे नाव शिधापत्रिकेमधून कमी करुन त्यांना वेगळी शिधापत्रिका देणेबाबत. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.भगवान बापू भाने यांनी त्यांचा विभक्त मुलगा श्री. अभिजित याचे नाव शिधापत्रिकेमधून कमी करुन त्यांना वेगळी शिधापत्रिका देण्याची मागणी केली आहे.

प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपीलकर्त्याने आयोगाकडे अपील दाखल केले सदर अपील पाहता अपीलकर्त्याने मागितलेली बाब "माहिती" ठरत नाही, ती कार्यवाहीशी निगडीत आहे, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१५-०१-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मामासाहेब उर्फ संभाजी मधुकर चव्हाण
मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक,
शाखा रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पुणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक,
शाखा रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १६.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मामासाहेब ऊर्फ संभाजी मधुकर चव्हाण
मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक,
शाखा रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.२.०७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.३.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>एप्रिल २००५ ते मार्च २००७ पुणे जिल्हा मध्यवर्ती सह.बँक, शाखा रेडणी या शाखेने एकूण किती व कोणकोणत्या विविध सोसायटीना दिलेल्या कर्जाची माहिती. | |

## विवेचन

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे या शाखेने विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांना दिलेल्या कर्जाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.मामासाहेब ऊर्फ संभाजी मधुकर चव्हाण यांनी बँकेकडे मागितली होती. बँकेने त्याची दखल न घेतल्याच्या कारणावरुन श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले. परंतु त्यांनीही अपिलाची दखल घेतली नाही. या कारणावरुन श्री.चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.चव्हाण यांना अपेक्षित असलेली माहिती पूर्वी देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना ती पुन्हा दिली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, शाखा रेडणी, ता.इंदापूर यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. मात्र आपण २००४ साली माहिती मागणीचा अर्जच केला नव्हता. दि.३.२.२००७ ला अर्ज केला होता. राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर आपल्याला माहिती मिळाली, असे श्री.चव्हाण यांनी सांगितले. श्री.चव्हाण यांना माहिती देऊ केली होती, परंतु त्यांनी ती स्वीकारली नाही, म्हणून कुरीअरद्वारे त्यांना ती पाठविण्यात आली, असे बँकेचे विद्यमान रेडणी शाखा व्यवस्थापक, श्री.एम.ई.शिंदे व तत्कालीन व्यवस्थापक श्री.एम.के.गायकवाड यांनी सांगितले. पाठविलेल्या माहितीची प्रत त्यांनी सादर केली. अधिकाऱ्यांच्या बदल्या व अन्य कारणांमुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही, असे श्री.गायकवाड व श्री.शिंदे यांनी नमूद केले. विहित मुदतीत माहिती दिली गेली पाहिजे, याची समज विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.एम.ई.शिंदे व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एम.के.गायकवाड यांना देण्यात येत आहे. देऊ केलेली माहिती अपीलकर्त्याने नाकारणे योग्य

नाही. ती स्वीकारुन त्याबाबतचा आक्षेप असल्यास तो नंतर नोंदविता येऊ शकतो, याची समज अपीलकर्ता श्री.मामासाहेब ऊर्फ संभाजी मधुकर चव्हाण यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१९.१.२००९**

<u>जानेवारी-२००९ ४५-४७</u>

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप विठ्ठल भुजबळ
स.नं.२०६, रस्ता क्र.५, तुकाईदर्शन,
फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, हवेली, जि.पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
ग्रामसेवक, ग्रामपंचायत फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८२१/ पुणे / २००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.२..२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१२.२००७ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>स्वजलधारा योजनेचे अंदाजपत्रक, मंजुरी पत्र, ग्रामपंचायत ग्रामसभेच्या ठरावाची प्रत व त्यासोबत असणाऱ्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दिलीप विठ्ठल भुजबळ यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर न मिळाल्याच्या कारणावरून राज्य माहिती आयोगाकडे अपील केले होते. परंतु संपूर्ण माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, फुरसुंगी, ता. हवेली श्री. जे.एस.शेलार व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हवेली श्री. बी. टी. पवार यांनी दि. २७.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'चे वेळी प्रपत्रात नमूद केले होते. अपीलकर्ता त्यावेळी गैरहजर होते. आयोगापुढील सुनावणीतही अपीलकर्ता गैरहजर होते. मात्र आपल्याला माहिती मिळाली असून आणखी काही माहिती हवी असल्यास देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले असल्यामुळे तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्ता श्री. भुजबळ यांनी दि. ११.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले होते. तसे पत्र जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, फुरसुंगी यांनी सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.१.२००९